| | |
|---|---|
| MHLA050013722025 | खटला दाखल तारीख - ०१.१२.२००८ |
| | खटला नोंदणी तारीख - ०१.१२.२००८ |
| | खटला निकाल तारीख- १५.०५.२०२६ |
| | कालावधी - १७ वर्षे ०५ महिने १४ दिवस. |

<u>अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अहमदपूर, यांचे न्यायालयात.</u>

**( पिठासीन अधिकारी - आर.डी. वाबळे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक– १५.०५.२०२६)**

<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक.२०९/२००८</u> <u>निशाणी क्र-.</u>

गुन्हा नोंद क्र.२११/२००८, पोलीस ठाणे, अहमदपूर

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष. | | महाराष्ट्र शासन,<br>तर्फे सहायक पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, अहमदपूर,<br>ता. अहमदपूर जि. लातूर. |
| अभियोग पक्षा तर्फे. | | सहा.शासकिय अभियोक्ता श्रीमती ए.एन. काकडे, |
| आरोपीं. | | १. बेबीनंदा भ्र. इंद्रजीत कसबे,<br>वय - ३० वर्षे कामधंदा -घरकाम,<br>२. बबिता भ्र. सुरज उपाध्याय,<br>वय - ३५ वर्षे कामधंदा -घरकाम,<br>दोघेही रा.गांधी नगर, उदगीर, जि. लातूर. |
| आरोपीं तर्फे विधीज्ञ. | | श्री. आर.बी.लोंढे |

<u>भाग- ब</u>

<u>**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)**</u>

| | |
|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | १०.११.२००८ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | ३०.११.२००८ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २२.०४.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखून ठेवल्याचा दि. | १५.०५.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दि. | | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## आरोपीचा तपशील

| आरोपीं क्र. | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामिना वर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत **(Set off)** करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | बेबीनंदा इंद्रजीत कसबे | दि.११.११.०८ | दि.१३.११.०८ | भा.दं.सं. कलम ३७९ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०२. | बबिता सुरज उपाध्याय | दि.१३.११.०८ | दि.१३.११.०८ | भा.दं.सं. कलम ३७९ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग- क
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)

| सा.क्र. | साक्षीदारांची नाव | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | माधव दत्तात्रय तेलघाणे | पंच साक्षीदार | २२ |
| ०२ | पुनम रवि जाधव | फिर्यादी | ४१ |

## अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त

| द.क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त

| द.क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | दोषारोप पत्र | ०१ |

| ०२ | फेरीस्त | ०२ |
|---|---|---|

बचाव पक्षाचा पुरावा

| द.क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभिलेखावरील मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

न्या य नि र्ण य
(पारीत दिनांक - १५.०५.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि. संबोधण्यात येते) चे कलम ३७९ सह ३४ नुसार आरोप ठेवण्यात आले आहे.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे -

०२. फिर्यादी पुनम रवी जाधव यांनी फिर्याद दिली की, दि.१०/११/२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजण्याच्या सुमारास त्या, त्यांची आई व बहिणीसोबत शिरुर ताजबंद येथील बस स्थानकावर लातूर जाण्यासाठी थांबले होते. तेवढयात वसमत - लातूर ही बस आल्यानंतर फिर्यादी, त्यांची आई व बहिणीसोबत बसमध्ये चढत असताना एक अनोळखी बाई त्यांच्या पुढे बसमये चढली व दुसरी बाई त्यांच्या पाठीमागून धक्का देवून पिशवी ओढून त्यांच्या गळयातील एक तोळयाची सोन्याची चैन तोडून चोरुन घेतली असता त्यातील सोन्याचे पान बसमध्ये खाली गळालेले लक्षात आले. तोपर्यंत त्या बाया बसमध्ये सर्वांत मागच्या सिटवर जावून बसल्या. फिर्यादीने त्यावेळी त्या बायांना त्यांनी सोन्याची चैन तोडून चोरुन घेतली असे म्हणाली असता त्यांनी फिर्यादी व त्यांच्या आईला उलट शिवीगाळ व दमदाटी करु लागल्या. त्यांनी बसमध्ये कंडक्टर यांना बस पोलीस स्टेशनला घेण्यास सांगितले. त्यावरुन बस पोलीस स्टेशन चाकूर येथे आणण्यात आली. तेथे त्या बायांची झडती घेतली असता त्यांनी चैन दुसऱ्याकडे लांबवली आहे. म्हणून, फिर्यादीने घटनेबाबत पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द फिर्याद नोंदवली.

०३. सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, अहमदपूर यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह ३४ नुसार गुन्हा क्रमांक २११/२००८ नोंदविला व गुन्हयाचे तपासकाम पोलीस नाईक/ब.क्र.११२९, श्री.विभुते यांच्याकडे वर्ग करण्यात आले. तपासकामी तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व घटनास्थळ पंचनामा केला. गुन्हयातील मुद्देमाल जप्त करुन जप्ती पंचनामा केला. तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले.

दोषारोप निश्चिती व आरोपींचा जबाब **:-**

०४. सदर प्रकरणात आरोपीं हजर झाल्यानंतर, माझे पुर्व पिठासन अधिकारी यांनी आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०७ अन्वये दस्ताची पुर्तता केली. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४० अन्वये **(**निशाणी क्र.३७**)** भारतीय दंड विधान कलम ३७९ सह ३४ गुन्ह्यासाठी दोषारोप निश्चीत केला. तद्नंतर, आरोपींना दोषारोपातील कथने त्यांचे मातृभाषेत समजावले. आरोपींचे निवेदन अनुक्रमे **(**निशाणी क्र.३८ व ३९**)** अन्वये गुन्हा नाकबुल करुन, प्रकरणाची संपरिक्षा करणेची याचना केली.

०५. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदवून झाल्यानंतर सबळ पुरावा अभिलेखावर दिसून आला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३-१(ब) अन्वये निवेदन न नोंदविता प्रकरण पुढे चालु ठेवले.

०६. प्रस्तुत खटल्याचे निर्णयार्थ खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १०.११.२००८ रोजी १७.०० वाजण्याचे सुमारास, शिरुर ताजबंद बस स्टॅण्डवर, शिरुर ताजबंद येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीची एक तोळा सोन्याची चैन चोरी करीत असताना मिळून आले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...**नकारार्थी**.** |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे**.** |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्रमांक ०१ करीताः</u>-

०७. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार माधव दत्तात्रय तेलघाणे (सा.क्र.०१) यांचा पुरावा निशाणी क्र.२२ वर नोंदविण्यात आला. सदर साक्षीदाराने आपले पुराव्याचे दरम्यान त्यांना पंचनाम्याकरीता बोलविण्यात आले नसल्याचे कथन केले. साक्षीदाराने पंचनाम्यातील मजकुरांची त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. पंच साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी अभियोक्यांना उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु, उलटतपासातून अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही पुरवा अभिलेखावर आला नाही.

०८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी पुनम रवि जाधव (सा.क्र.०२) यांचा पुरावा निशाणी क्र.४१ वर नोंदविण्यात आला. सदर साक्षीदाराने पुराव्याचे दरम्यान असे कथन केले की, घटनेच्या दिवशी शिरुर ताजबंद येथून लातूर येथे जाण्याकरीता बस स्थानक येथे थांबले असताना त्यांची एक तोळयाची चैन चोरी झाली होती. या प्रकरणातील आरोपींविरुध्द त्यांची कोणतीही तक्रार नाही. या आरोपींनी त्यांची चैन चोरली नव्हती. त्यांना प्रकरण चालवयाचे नाही. या प्रकरणात कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाहीत. आरोपींनी निर्दोष मुक्तता केल्यास त्यांची कोणतीही हरकत नाही असे कथन केले आहे.

०९. अभियोग पक्षाचे फिर्यादी व इतर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत. फौजदारी खटल्यामध्ये आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता गुन्ह्यांचा प्रत्येक टप्पा अभियोग पक्षाने सबळ व निर्विवाद पुराव्यामार्फत शक्यतेच्या पलिकडे जावून सिध्द करणे गरजेचे असते. या प्रकरणी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी व इतर साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच या प्रकरणात जप्ती पंच व तपासिक अंमलदार यांची साक्ष नोंदविली नसल्यामुळे अभियोग पक्षाने याठिकाणी तथाकथित घटनेच्या वेळी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीच्या गळयातील एक तोळयाची सोन्याची चैन चोरी केली, ही बाब अभियोग पक्षाने निःशंकपणे सबळ व ठोस पुरावा देऊन सिध्द केली नाही. त्यामुळे, मी मुद्दा क्रमांक ०१ चे नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक ०२ करीता</u>:-

१०. मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात आल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.०२ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहेः-

-ः <u>आ दे श</u> ः-

१. आरोपी क्र.१ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ चे अनुपालनास्तव प्रत्येकी रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र व जातमुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर).

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.05.15 13:26:33 +0530

स्थळ - अहमदपूर.
दिनांक - १५/०५/२०२६.

**( आर.डी. वाबळे )**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.